महाराष्ट्र शासन

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा

सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

दिनांक : ०५/०६/२०२५

**संदर्भ :नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा कार्यालयाने प्रसिध्द केलेली दि.30/05/2025 ची जाहिरात**

**शुध्दीपत्रक**

**नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी या कार्यालयामार्फत शासकीय वाहन दुरुस्तीसाठी काही मान्यताप्राप्त गॅरेजना यापूर्वी मान्यता देण्यात आलेली आहे. सदर गॅरेजना मान्यता देवून बराच कालावधी होऊन गेलेला आहे. त्यामुळे सुधारित शासन मान्य गॅरेजला मान्यता देणे आवश्यक झाल्यामुळे यापूर्वी शासन मान्यता दिलेल्या सर्व गॅरेजची मान्यता रद्द करुन सुधारित गॅरेजला शासन मान्यता देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.**

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय वाहनांची दुरुस्तीची कामे जलदगतीने करण्यासाठी **अत्याधुनिक व स्वंयचलित वाहनांची दुरुस्ती करणा-या वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजसना, शासन मान्यता मिळण्यासाठी दिनांक ०२/०६/२०२५ ते १३/०६/२०२५ या कालावधीत** इच्छुकता अर्ज मागवित आहेत. या संदर्भातील अटी व शर्तीसह अर्ज नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई यांच्या कार्यालयात दिनांक ०२/०६/२०२५ ते १३/०६/२०२५ या कालावधीत उपलब्ध होतील.

सदर अर्जाची किंमत रुपये ५००/- ( ना-परतावा ) असून सदर रक्कम भरुन अर्ज भरण्यात यावेत. शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई कार्यालयातून घेतलेला अर्ज ग्राहय मानण्यात येईल, अन्य ठिकाणाहून घेतलेला अर्ज ग्राहय मानण्यात येणार नाही. याबाबत अधिक माहितीसाठी व अर्ज देण्यासाठी श्री शेरअली शेख , मोबाईल क्र. ९५९४९५९९९२ वर संपर्क साधावा.

**(अजय साखरे )**
**नियंत्रक**
**शासकीय परिवहन सेवा, मुंबई**

Scanned with OKEN Scanner

अर्ज क्रमांक :
अर्जाची किंमत रु. 500/-

परिशिष्ट - 1

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अत्याधुनिक व स्वंयचलित वाहनांची दुरुस्ती करणा-या वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजसना, शासन मान्यता मिळण्यासाठी अर्जाचा नमुना

प्रति,
नियंत्रक
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला रोड
वरळी, मुंबई 400030

विषय : शासकीय वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी मान्यता मिळणे बाबत...

महोदय,

दिनांक 02/06/2025 रोजी दैनिक या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीस अनुसरुन मी मालक/प्रोप्रायटर/व्यवस्थापक या नात्याने या वाहन उत्पादक कंपनीचे गॅरेज/ खाजगी गॅरेज साठी खालील प्रमाणे अर्ज सादर करीत आहे.

1) गॅरेजचे नाव व पत्ता :

2) गॅरेज मालकाचे नाव : दुरध्वनी/मोबाईल नंबर :

व्यवस्थापकाचे नाव : दुरध्वनी/मोबाईल नंबर :

सुपरवायझरचे नाव : दुरध्वनी/मोबाईल नंबर :

खालील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे जोडावीत.

| अ.क्र. | अट | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| 1 | वाहन दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचे क्षेत्रफळ | जागा मालकीबाबतची कागदपत्रे, भाडेकरारपत्र, पॉपर्टी कार्ड |
| 2 | एकाच वेळी एकूण किती वाहनांवर दुरुस्ती करणे शक्य आहे | वाहन संख्या नमुद करावी |
| 3 | शॉप अँड इस्टेब्लिशमेंट नोंदणी प्रमाणपत्र | शॉप अँड इस्टेब्लिशमेंट नोंदणी प्रमाणपत्र, उदयम प्रमाणपत्र |
| 4 | जीएसटी नंबर | जीएसटी प्रमाणपत्र |
| 5 | मागील 3 वर्षाचा आयकर भरल्याचा पुरावा | सन 2022-23, 2023-24, 2024-25 पर्यतचा आयकर भरल्याचा पुरावा |
| 6 | 3 वर्षे अनुभवाचे प्रमाणपत्र | खाजगी, निमशासकीय / शासकीय वाहनांची दुरुस्ती केल्याचे अनुभव प्रमाणपत्र |
| 7 | वाहन दुरुस्ती क्षेत्रातील पदविका असलेल्या कामगारांची माहिती | गॅरेजमधील कामगारांची माहिती देण्यात यावी. |
| 8 | कार लिफटर | कार लिफटर बाबत माहिती देण्यात यावी |
| 9 | आग प्रतिबंधक उपकरणे | आग प्रतिबंधक उपाययोजनेची माहिती देण्यात यावी |
| 10 | करारनामा | नोटराईज्ड करारनामा करण्यात यावा |
| 11 | वाहन दुरुस्ती उधारीतत्वावर करण्याबाबत | वाहन दुरुस्तीनंतर देयक रक्कम 90 दिवसात अदा करण्यात येईल. |

3) गॅरेजमध्ये वाहनांच्या विविध प्रकारच्या दुरुस्त्या करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा

| टीन वर्क व स्प्रे पेटींग | ऑटो इलेक्ट्रीकल | वातानुकुलीत यंत्रणा | अपहोस्ट्रीचे काम | टायरचे काम व्हील बॅलेसिंग/व्हील अलायमेंट |
|---|---|---|---|---|
| आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही | आहे/नाही |

4) गॅरेज मधील उपकरणांचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट -2 मध्ये दयावा.
वरील माहिती ही सत्य असून, चुकीची आढळून आल्यास गॅरेजला देण्यात आलेली शासन मान्यता कोणत्याही स्तरावर रदद करण्यात येईल, ही बाब मला माहिती आहे.

गॅरेज मालक/व्यवस्थापक स्वाक्षरी
नाव :

अटी व शर्ती :-

**निविदा सादर करताना वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजनी खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.**

१) सुरक्षा ठेव रक्कम रु. १,००,०००/- शासनाकडे डीडी/बँक गॅरंटी द्वारे जमा करावी लागेल. सुरक्षा ठेव परत करताना कोणतेही व्याज देय राहणार नाही.

२) वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजनी ०३ वर्षे अत्याधुनिक व स्वयंचलित वाहने दुरुस्तीचा अनुभव असल्याची कागदपत्रे सादर करावीत.

३) गॅरेजमध्ये अत्याधुनिक वाहन दुरुस्ती संदर्भातील Diagnostics equipment असावी.

**४) गॅरेजमध्ये स्वयंचलित वाहन उदवाहक असावेत.**

५) गॅरेजमध्ये ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील पदवीका किंवा पदवीधर असलेले प्रशिक्षित कर्मचारी असावेत.

६) गॅरेजमध्ये आग सुरक्षा विषयक अत्याधुनिक यंत्रणा असणे आवश्यक आहे.

७) करारातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत वाहनांची दुरुस्ती करुन देणेबाबत रुपये ५००/- च्या स्टँप पेपरवर नोटराईज्ड करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

८) कराराचे पालन समाधानकारक न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे. तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचा निर्णय उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग राशि ३, मंत्रालय, मुंबई यांचा राहील.

९) गॅरेजला शासन मान्यता मिळण्यासाठी शासकीय परिवहन सेवा, मुंबई येथुन मिळणारा विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागेल. (परिशिष्ट-१)

१०) गॅरेज मालक/कंपनी सर्व्हिस सेंटर यांनी मुखत्यार (Authorization) प्रमाणपत्र करावा लागेल. ( (परिशिष्ट-४)

११) ऑनलाईन बिल सादर करताना गॅरेजसची डिजीटल स्वाक्षरी/सही आवश्यक राहील.

१२) गॅरेजेसना शासनाची वाहने दुरुस्तीबाबतचा करार संपुष्टात आणावयाचा झाल्यास, तीन महिन्याची आगावू नोटीस देणे आवश्यक राहील.

१३) **शासकीय वाहन दुरुस्तीनंतर** देयक रक्कम ९० दिवसात **अदा करण्यात येईल.**

१४) वाहन दुरुस्तीबाबत पुरवठादाराचे/कंत्राटदाराने प्रदान फक्त ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस द्वारेच करण्यात येईल. त्यासाठी core Banking ची सुविधा असलेल्या बँकेतच खाते उघडणे बंधनकारक राहील.

१५) निविदादाराने अटी व शर्तीच्या प्रत्येक पानावर व विवरण पत्रावर तसेच निविदादाराने स्वाक्षरी केलेले हमी पत्र अनिवार्य राहील.

१६) दर करारासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी करण्यात यावा.

१७) दरपत्रकासोबत जोडावयाची कागदपत्रांची यादी/चेक लिस्ट अनिवार्य

१८) पुरवठादार/कंत्राटदार यांच्यावर वैयक्तिक अथवा संस्थेच्या नावे कोणतीही न्यायालयीन अथवा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल असल्याची बाब नाही, याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे. (अनिवार्य)

१९) करारा संबधी काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे **कार्यक्षेत्र मुंबई** राहील.

**अजय साखरे**
**नियंत्रक**
**शासकीय परिवहन सेवा, मुंबई**

## अवजारांबददल माहिती

| अ.क्र. | **अवजारांबददल माहिती** | आहे/नाही | संख्या | शेरा (तपशिल दयावा) |
|---|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रॉनिक स्कॅनर (सर्व मॉडेलसाठी) | | | |
| २ | जॅक्सची संख्या व क्षमता | | | |
| ३ | क्रेन | | | |
| ४ | कार स्टॅंड | | | |
| ५ | पुलर (ड्रम. इंजिन पुली. स्प्रिंग कॉल/ऑईल सिल. एक्सल. बेअरिंग /पिस्टन रिंग) | | | |
| ६ | इंजिन टायमिंग लाईट | | | |
| ७ | फाईल सेट (सर्व प्रकारचे)हॅक सॉ | | | |
| ८ | स्क्रु ड्रायव्हर सेट (सर्व प्रकारचे) | | | |
| ९ | ग्रायडींग मशिन | | | |
| १० | हॅमर सर्व प्रकारचे | | | |
| ११ | बेंच वाईस | | | |
| १२ | टॅप अँड डाईज | | | |
| १३ | डॉक चेक / चेक थ्रु | | | |
| १४ | हॅन्ड प्रेस | | | |
| १५ | व्हर्निसर कॅलिपर | | | |
| १६ | मायक्रोमिटर | | | |
| १७ | ट्राय स्केअर्स | | | |
| १८ | कॅलिपर्स | | | |
| १९ | स्वीट ड्रील्स | | | |
| २० | सर्व प्रकारच्या पक्कड | | | |
| २१ | स्टेअरिंग बॉक्स पाना | | | |
| | **जोडणी कामासाठी** | | | |
| १ | पक्कड (नोझ/मंकी/सब्धी) | | | |
| २ | पंच | | | |
| ३ | छिनी | | | |
| ४ | मोठी पिझर (पत्र कापण्यासाठी/साधी) | | | |
| ५ | रंग कामासाठी | | | |
| ६ | कॉम्प्रेसर मशिन | | | |
| ७ | स्प्रे गन प्लास्टीक पाईपसह | | | |
| ८ | स्क्रॅपर / लांबी पटटी | | | |
| ९ | पेंट बुथ | | | |
| | **विदयुत कामासाठी** | | | |
| १ | आर्मिचर टेस्टर (ग्लाव्हरर) | | | |
| २ | व्हॉल्व रेग्युलर टेस्टर | | | |
| ३ | सॉल्डरिंग आर्यन | | | |
| ४ | आल्टरनेटर टेस्टर | | | |
| | **अपहोल्स्ट्री कामासाठी** | | | |
| १ | इंडस्ट्रीयल शिलाई मशिन | | | |
| २ | रेक्झीन प्रेसिंग वेल्डींग मशिन | | | |
| ३ | हेवी डयुटी कात्री/ हायस्पीड ब्लेड | | | |
| ४ | सेंटर होल पंच | | | |
| ५ | मांची पक्कड/ साधी पक्कड | | | |
| | **वेल्डींग कामासाठी** | | | |
| १ | इलेक्ट्रीक वेल्डींग मशिन | | | |
| २ | गॅस वेल्डींग प्लॅन | | | |
| ३ | चिपींग हॅमर | | | |
| ४ | गॉगल / लायटर | | | |
| १ | **ब्रेक डाऊन व्हॅन** | | | |

गॅरेज मालक/व्यवस्थापक स्वाक्षरी

नाव :

दिनांक :

# परिशिष्ट - 2

प्रति,

नियंत्रक,

शासकीय परिवहन सेवा

वरळी, मुंबई 400030

**विषय : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अत्याधुनिक व स्वंयचलित वाहनांची दुरुस्ती करणा-या वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजसना, शासन मान्यता मिळणे बाबत...</u>**

**महोदय,**

1.मी/आम्ही घोषित करतो की  आणि वाहन दुरुस्तीच्या क्षेत्रात एक स्थापित सेवा प्रदाता आहोत.

2. आम्ही घोषित करतो की वाहन दुरुस्तीसाठी शासन मान्यता मिळणेबाबत सादर केलेल्या दस्तऐवजात नमूद केलेल्या मानकानुसार सेवा प्रदान करण्यासाठी आमच्याकडे पुरेसे अधिकृतता/परवाना आहे.

3. आम्ही वचन देतो की, आम्हाला/मला शासनाच्या वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी आमच्या/ माझ्या गॅरेजला शासन मान्यता दिल्यास अटी व शर्ती व अनुषंगिक कागदपत्राप्रमाणे यामध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवा प्रदान केल्या जातील .आणि आम्ही/मी निविदा प्राधिकरणाने विहित केलेल्या सर्व आनुषंगिक सेवा करू.

4. मी /आम्ही अटी व शर्तीनुसार शासनाच्या वाहनांची दुरुस्ती करण्यास तयार असून यासाठी माझ्या/आमच्या कोणत्याही अटी असणार नाहीत.

गॅरेज मालक/व्यवस्थापक स्वाक्षरी

नाव :

दिनांक :

परिशिष्ट – ४

# प्राधिकारपत्र

प्रति.
नियंत्रक
शासकीय परिवहन सेवा
वरळी. मुंबई ४०००३०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय कार्यालयाच्या मालकीच्या वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी करावयाच्या अर्जाबाबत दिनांक रोजीच्या वर्तमानपत्रातील जाहिरात/महाराष्ट्र शासनाच्या पोर्टवरील दिनांक च्या जाहिरातीच्या अनुषगाने कंपनीच्या / गॅरेजच्या वतीने आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यासाठी / बैठकांना उपस्थित राहण्यासाठी श्री पद यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

वाहन उत्पादक कंपनीचे सर्व्हिस सेंटर /
खाजगी गॅरेज प्रोप्रायटरचे नाव
पद / कंपनी शिक्का

परिशिष्ट - 3

**स्व-घोषणा (नोटाराइज्ड शपथपत्र)**

प्रति,

नियंत्रक,

शासकीय परिवहन सेवा

वरळी, मुंबई ४०००३०

१.आम्ही वाहन उत्पादक कंपनीचे भागीदार/व्यवस्थापक / गॅरेज मालक / घोषित करतो की : - **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अत्याधुनिक व स्वंयचलित वाहनांची दुरुस्ती करणा-या वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजसना, शासन मान्यता मिळणेसाठीच्या अर्जासोबत** सादर केलेले सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे सत्य आणि वैध आहेत.

2. जर सादर केलेली कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/चुकीची असल्याचे आढळून आले, तर महाराष्ट्र शासन हे योग्य वाटेल तशी कारवाई माझ्या/आमच्यावर करतील हे मला/आम्हाला मान्य आहे. ज्यामध्ये करार/पुरवठा आदेश रद्द करणे, बयाणा रक्कमेसह सर्व देयके जप्त करणे आणि मला/आमच्या कंपनी/गॅरेजला/संस्थेला काळ्या यादीत टाकणे इत्यादींचा समावेश आहे.

**3.** मी/आम्ही सादर केलेली कागदपत्रे ही सत्य असून जर त्यात काही फेरफार आढळून आले तर माझे/आमचे शासकीय वाहने दुरुस्तीबाबतची मान्यता रद्द केले जाऊ शकते हे मला/आम्हाला मान्य आहे. मी/आम्ही हे देखील वचन देतो की, आम्ही या संदर्भात कोणताही वाद उपस्थित करू शकत नाही.

**4.**आम्ही याद्वारे घोषित करतो की आमच्या अधिकृत सर्व्हिस सेंटर/खाजगी गॅरेज यांचे भूतकाळातील निष्कलंक रेकॉर्ड आहे आणि भ्रष्ट आणि फसव्या पद्धतींसाठी अनिश्चित काळासाठी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र घोषित करण्यात आले नव्हते.

5. मी/आम्ही, मेसर्स (कंपनीचे नाव) आजपर्यंत भारत सरकारच्या कोणत्याही विभागात किंवा कोणत्याही राज्य सरकारमध्ये किंवा राज्य/केंद्र सरकारच्या कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात काळ्या यादीत नाही.

**6.** आम्ही याद्वारे घोषित करतो की आजपर्यंत महाराष्ट्र सरकार किंवा इतर कोणत्याही न्यायालयात वाहन उत्पादक कंपनीचे सर्व्हिस सेंटर/खाजगी गॅरेजच्या पत्त्याविरुद्ध कोणतेही खटले प्रलंबित नाहीत. (नाव आणि पत्ता

7. आम्ही याद्वारे घोषित करतो की, कंपनी किंवा कंपनीचे संचालक/मालक आजपर्यंत कोणत्याही न्यायालयाने किंवा सक्षम अधिकाऱ्यांनी दिवाळखोर घोषित केलेले नाहीत किंवा कोणत्याही फसव्या अर्थाने (आर्थिक आणि गुन्हेगारी) गुंतलेले नाहीत.

8. आम्ही याद्वारे घोषित करतो की आयपीआरचे उल्लंघन किंवा भारत सरकारच्या आयटी कायद्याच्या इतर कोणत्याही तरतुदींबाबत भारतातील किंवा परदेशातील कोणत्याही न्यायालयांमध्ये/वैधानिक प्राधिकरणात कंपनीविरुद्ध कोणताही कायदेशीर खटला आणि/किंवा प्रक्रिया प्रलंबित नाही.

गॅरेज मालक/व्यवस्थापक स्वाक्षरी

नाव :

दिनांक :

## करार पत्र

करार लिहून देणार

मे.

मुंबई

करार लिहून घेणार
नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा
वरळी, मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय कार्यालयाच्या मालकीची वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी या वर्तमानपत्रात/महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवर दिनांक रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांच्याशी हा करार दिनांक रोजी करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय कार्यालयाच्या मालकीची वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी या करारान्वये मी / आम्ही खालील अटी व शर्ती पाळण्यास बांधील राहीन/राहू.

अटी व शर्ती :-

१) सुरक्षा ठेव रक्कम रु. १,००,०००/- शासनाकडे डीडी/बँक गॅरेंटी द्वारे जमा करण्यात येईल. सुरक्षा ठेव परत करताना कोणतेही व्याज देय राहणार नाही.

२) वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजनी ०३ वर्षे अत्याधुनिक व स्वयंचलित वाहने दुरुस्तीचा अनुभव असल्याची कागदपत्रे सादर करण्यात येईल.

३) गॅरेजमध्ये अत्याधुनिक वाहन दुरुस्ती संदर्भातील Diagnostics equipment आहेत.

**४) गॅरेजमध्ये स्वयंचलित वाहन उदवाहक आहेत.**

५) गॅरेजमध्ये ऑटोमोबाईल्स क्षेत्रातील पदवीका किंवा पदवीधर असलेले प्रशिक्षित कर्मचारी आहेत.

६) गॅरेजमध्ये आग सुरक्षा विषयक अत्याधुनिक यंत्रणा असणे आवश्यक आहे.

७) करारातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहित वेळेत वाहनांची दुरुस्ती करुन देणेबाबत रुपये ५००/- च्या स्टँप पेपरवर नोटराईज्ड करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

८) वाहनांची दुरुस्ती लवकरात लवकर करण्यात येईल, वाहनाची उधारी तत्वावर दुरुस्ती करण्यात येईल, वाहन दुरुस्तीनंतर देयक रक्कम ९० दिवसात अदा करण्यात येईल हे मला ज्ञात आहे.

९) कराराचे पालन समाधानकारक न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे. तसेच कराराची मुदत वाढविणे याबाबतचा निर्णय उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग राशि ३, मंत्रालय, मुंबई यांचा राहील.

१०) वाहन दुरुस्तीचे देयक तीन प्रतीत सादर करण्यात येईल, देयक पंधरा दिवसात कार्यालयास देण्यात येईल.

११) निविदादाराने अटी व शर्तीच्या प्रत्येक पानावर व विवरण पत्रावर तसेच निविदादाराने स्वाक्षरी केलेले हमी पत्र अनिवार्य राहील.

१२) पुरवठादार/कंत्राटदार यांच्यावर वैयक्तिक अथवा संस्थेच्या नावे कोणतीही न्यायालयीन अथवा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल असल्याची बाब नाही, याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे. (अनिवार्य)

१३) दर करारासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी करण्यात यावा.

१४) करारा संबधी काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे **कार्यक्षेत्र मुंबई** राहील.

करार लिहून देणार

**मे.**

करार लिहून घेणार

**(अजय साखरे)**
**नियंत्रक**
**शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई**

महाराष्ट्र शासन
नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

दिनांक : ३०/०५/२०२५

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील शासकीय वाहनांची दुरुस्तीची कामे जलदगतीने करण्यासाठी **अत्याधुनिक व स्वंयचलित वाहनांची दुरुस्ती करणा-या वाहन उत्पादक कंपनीची गॅरेज, खाजगी गॅरेजसना, शासन मान्यता मिळण्यासाठी दिनांक ०२/०६/२०२५ ते १३/०६/२०२५ या कालावधीत** इच्छुकता अर्ज मागवित आहेत. या संदर्भातील अटी व शर्तीसह अर्ज नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई यांच्या कार्यालयात दिनांक ०२/०६/२०२५ ते १३/०६/२०२५ या कालावधीत उपलब्ध होतील.

सदर अर्जाची किंमत रुपये ५००/- ( ना-परतावा ) असून सदर रक्कम भरुन अर्ज भरण्यात यावेत. शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई कार्यालयातून घेतलेला अर्ज ग्राहय मानण्यात येईल, अन्य ठिकाणाहून घेतलेला अर्ज ग्राहय मानण्यात येणार नाही. अर्जासाठी श्री शेरअली शेख , मोबाईल क्र. ९५९४९५९९९२ वर संपर्क साधावा.

**(अजय साखरे )**
**नियंत्रक**
**शासकीय परिवहन सेवा, मुंबई**